महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

जनसंपर्क अधिकारी यांचे कार्यालय

प्रकाशगड, २रा माळा, प्लॉट क्र. जी-९, प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१.

ई-मेल : pro@mahagenco.in | apro@mahagenco.in

क्र.: सां.नि. व सु/जनसंपर्क/वृत्तपत्रीय टिप्पणी/०५८ दिनांक : २५/०२/२०२६.

वृत्तपत्रीय टिप्पणी - मसुदा

महानिर्मिती-एनटीपीसी भागीदारीतून सिन्नर थर्मल पॉवर लिमिटेडचे अधिग्रहण यशस्वीरित्या पूर्ण

(मुंबई, २४ फेब्रुवारी २०२६) : सिन्नर थर्मल पॉवर लिमिटेड (STPL) च्या अधिग्रहणाची प्रक्रिया दिनांक २४.०२.२०२६ रोजी यशस्वीरित्या पूर्ण झाली आहे. सदर अधिग्रहण कार्यक्रम दिल्लीतील एनटीपीसी मुख्यालय येथे पार पडला. या प्रकल्पाच्या पुनरुज्जीवन व पुनर्संचनासाठी सादर करण्यात आलेल्या ठराव योजनेस National Company Law Tribunal (एनसीएलटी) कडून दि.२८.११.२०२५ रोजी मान्यता प्राप्त झाली होती. यासाठी आवश्यक रुपये ३,८००.१४ कोटी रक्कम भरल्याने नाशिक जिल्ह्यातील सिन्नर येथील १,३५० मेगावॅट क्षमतेच्या कोळसा आधारित औष्णिक विद्युत प्रकल्पाच्या पुनरुज्जीवनाचा मार्ग मोकळा झाला आहे. हे अधिग्रहण महानिर्मिती-एनटीपीसी लिमिटेड यांच्या संयुक्त (५०:५०%) भागीदारीने करण्यात आले आहे.

या महत्त्वपूर्ण अधिग्रहणाची यशस्वी पूर्तता केंद्र व राज्य राज्य सरकार यांच्या सातत्यपूर्ण मार्गदर्शन व पाठिंब्यामुळे शक्य झाली आहे. राज्यातील अडचणीत सापडलेल्या मालमत्तांचे पुनरुज्जीवन, सार्वजनिक क्षेत्रातील पायाभूत सुविधा बळकट करणे तसेच विश्वासार्ह व परवडणारी वीजपुरवठा व्यवस्था सुनिश्चित करण्याच्या राज्य शासनाच्या धोरणाशी ही पुढाकारपूर्ण पायरी सुसंगत आहे. या उपक्रमामागे मा. मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाचा व सक्रिय पाठिंब्याचा मोलाचा वाटा असून, राज्यातील महत्त्वाच्या वीज पायाभूत सुविधांच्या पुनरुज्जीवनास गती मिळाली आहे.

महानिर्मितीच्या व्हीजन 2035 अनुरूप महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शन आणि पाठिंब्यामुळे हे अधिग्रहण जलदगतीने करणे शक्य झाले. या कार्यक्रमप्रसंगी महानिर्मितीकडून संचालक (प्रकल्प) श्री. अभय हरणे, संचालक (वित्त) श्री. मनेष वाघीरकर, मुख्य अभियंता (प्रकल्प व नियोजन) तथा मुख्य कार्यकारी अधिकारी (STPL) श्री. अतुल सोनजे, महाव्यवस्थापक (लेखा) श्री. संदेश मोरे मुख्य, कंपनी सचिव श्री. राहुल दुबे, अधिक्षक अभियंता (प्रकल्प व नियोजन) श्री. प्रविण भोये, उप कार्यकारी अभियंता (प्रकल्प व नियोजन) श्री. अभिजीत मते, कंपनी सचिव (STPL) श्री. संदीप गेंड, व एनटीपीसीकडून संचालक (वित्त) श्री. जयकुमार श्रीनिवासन, संचालक (संचलन) तथा अध्यक्ष (STPL) श्री. रविंदर कुमार, संचालक (प्रकल्प) के. सुंदरम, महाव्यवस्थापक (व्यापार विकास) श्री. अजयकुमार चतुर्वेदी, महाव्यवस्थापक (व्यापार विकास) श्री. मुनीश कुमार जैन, वरिष्ठ व्यवस्थापक(व्यापार विकास) उमर फारुक व अन्य मान्यवर उपस्थित होते.

महानिर्मिती व एनटीपीसी लिमिटेड यांच्या भागीदारीने सादर केलेल्या ठराव योजनेस १४.०६.२०२५ रोजी कर्जदार समिती (Committee of Creditors - CoC) कडून लेटर ऑफ इंटेंट (LoI) प्राप्त झाले होते. ही प्रक्रिया दिवाळखोरी व शोधन अक्षमता संहिता(IBC) २०१६ मधील तरतुदीनुसार पार पाडण्यात आली.

अधिग्रहणानंतर प्रकल्पाच्या पुनर्संचय व तयारीच्या कामांना प्राथमिक सुरुवात करण्यात आली असून, ६ ते ८ महिन्यांच्या कालावधीत पहिल्या दोन संचांना कार्यान्वित करण्याचा मानस आहे. उर्वरित ३ संच पुढील २ ते ३ वर्षांच्या कालावधीत कार्यान्वित करण्यात येणार असून, यामुळे महाराष्ट्राच्या वीजप्रणालीत विश्वासार्ह बेस-लोड क्षमतेची भर पडणार आहे.

सिन्नर थर्मल पॉवर लिमिटेडच्या पुनरुज्जीवनामुळे राज्यामध्ये रोजगार संधी निर्माण होण्याची अपेक्षा आहे. पुनरुज्जीवन, कमिशनिंग आणि कार्यान्वयन टप्प्यांमध्ये अभियंते, तांत्रिक कर्मचारी, कुशल व अकुशल कामगार, कंत्राटदार तसेच सहाय्यक सेवा पुरवठादारांना रोजगार उपलब्ध होणार आहे. यासोबतच नाशिक परिसरातील पूरक व संबंधित उद्योगांच्या वाढीस चालना मिळून प्रादेशिक सामाजिक-आर्थिक विकासास हातभार लागणार आहे.

या अधिग्रहणामुळे महानिर्मितीची औष्णिक वीज निर्मिती क्षमता १०,२०० मेगावॅटवरून ११,५५० मेगावॅटपर्यंत वाढणार आहे. परिणामी, औष्णिक, वायू, सौर व जलविद्युत प्रकल्पांचा समावेश करून महानिर्मितीची एकूण स्थापित क्षमता १५+ गिगावॅट पोहोचणार असून, त्यामुळे महाराष्ट्र राज्याची ऊर्जा सुरक्षा अधिक भक्कम होणार आहे.

या महत्त्वपूर्ण अधिग्रहणाची यशस्वी पूर्तता केंद्र व राज्य राज्य सरकार यांच्या सातत्यपूर्ण मार्गदर्शन व पाठिंब्यामुळे शक्य झाली आहे. राज्यातील अडचणीत सापडलेल्या मालमत्तांचे पुनरुज्जीवन, सार्वजनिक क्षेत्रातील पायाभूत सुविधा बळकट करणे तसेच विश्वासार्ह व परवडणारी वीजपुरवठा व्यवस्था सुनिश्चित करण्याच्या राज्य शासनाच्या धोरणाशी ही पुढाकारपूर्ण पायरी सुसंगत आहे. या उपक्रमामागे मा. मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाचा व सक्रिय पाठिंब्याचा मोलाचा वाटा असून, राज्यातील महत्त्वाच्या वीज पायाभूत सुविधांच्या पुनरुज्जीवनास गती मिळाली आहे.

हे अधिग्रहण महानिर्मितीच्या शाश्वत वीज निर्मिती, उपलब्ध साधनसंपत्तीचा कार्यक्षम वापर, रोजगारनिर्मिती आणि महाराष्ट्राच्या दीर्घकालीन ऊर्जा स्वयंपूर्णतेच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे.

******

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित
जनसंपर्क अधिकारी यांचे कार्यालय
प्रकाशगड, २रा माळा, प्लॉट क्र. जी-९, प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१.
ई-मेल : pro@mahagenco.in | apro@mahagenco.in

MAHAGENCO-NTPC Consortium Successfully Completes Acquisition of Sinnar Thermal Power Limited

(Mumbai, February 24, 2026) : The acquisition process of Sinnar Thermal Power Limited (STPL) was successfully completed on February 24, 2026. The acquisition event took place at NTPC's headquarters in Delhi. The resolution plan submitted for the revival and restructuring of this project received approval from the National Company Law Tribunal (NCLT) on November 28, 2025. With the payment of the required amount of ₹3,800.14 crore, the path has been cleared for the revival of the 1,350 MW coal-based thermal power project located in Sinnar, Nashik district. This acquisition has been carried out through a 50:50 joint venture between MAHAGENCO (Maharashtra State Power Generation Company Limited) and NTPC Limited.

The successful completion of this significant acquisition has been possible due to the consistent guidance and support from the Central and State Governments. This proactive step aligns with the state government's policy of reviving distressed assets, strengthening public sector infrastructure, and ensuring reliable and affordable power supply. The visionary leadership and active support of the Hon'ble Chief Minister and Energy Minister Shri Devendra Fadnavis have played a valuable role in accelerating the revival of important power infrastructure in the state.

In line with MAHAGENCO's Vision 2035, this acquisition was successfully completed at a rapid pace due to the guidance and strong support of Chairman and Managing Director Shri. Radhakrishnan B. (IAS), On the occasion of the acquisition event, representatives from MAHAGENCO included Shri Abhay Harane, Director (Projects); Shri Manesh Waghirakar, Director (Finance); Shri Atul Sonje, Chief Engineer (Projects & Planning) and Chief Executive Officer (STPL); Shri Sandesh More, Chief General Manager (Accounts); Shri Rahul Dubey, Company Secretary; Shri Pravin Bhoye, Superintending Engineer (Projects & Planning); Shri Abhijit Mate, Deputy Executive Engineer (Projects & Planning); Shri Sandeep Gend, Company Secretary (STPL); and from NTPC: Shri Jayakumar Srinivasan, Director (Finance); Shri Ravinder Kumar, Director (Operations) and Chairman (STPL); Shri K. Sundaram, Director (Projects); Shri Ajaykumar Chaturvedi, General Manager (Business Development); Shri Munish Kumar Jain, General Manager (Business Development); Shri Umar Farooq, Senior Manager (Business Development); and other dignitaries were present.

The resolution plan submitted jointly by MAHAGENCO and NTPC Limited received a Letter of Intent (LoI) from the Committee of Creditors (CoC) on June 14, 2025. This process was carried out in accordance with the provisions of the Insolvency and Bankruptcy Code (IBC), 2016.

Following the acquisition, preliminary work on the revival and preparation of the project has begun, with the intention to operationalize the first two units within 6 to 8 months. The remaining three units are planned to be commissioned over the next 2 to 3 years. This will add reliable base-load capacity to Maharashtra's power system.

The revival of Sinnar Thermal Power Limited is expected to create employment opportunities in the state. During the revival, commissioning, and operational phases, jobs will be available for engineers, technical staff, skilled and unskilled workers, contractors, and ancillary service providers. Additionally, it will boost the growth of complementary and related industries in the Nashik region, contributing to regional socio-economic development.

With this acquisition, MAHAGENCO's thermal power generation capacity will increase from 10,200 MW to 11,550 MW. As a result, including thermal, gas, solar, and hydroelectric projects, MAHAGENCO's total installed capacity will reach 15+ GW, further strengthening Maharashtra's energy security.

This acquisition symbolizes MAHAGENCO's commitment to sustainable power generation, efficient utilization of available resources, employment creation, and Maharashtra's long-term energy self-reliance.

******

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

जनसंपर्क अधिकारी यांचे कार्यालय

प्रकाशगड, २रा माळा, प्लॉट क्र. जी-९, प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१.

ई-मेल : pro@mahagenco.in | apro@mahagenco.in

महानिर्मिती-एनटीपीसी भागीदारी से सिन्नर थर्मल पावर लिमिटेड का अधिग्रहण सफलतापूर्वक पूरा

(मुंबई, २४ फरवरी २०२६) : सिन्नर थर्मल पावर लिमिटेड (एसटीपीएल) के अधिग्रहण की प्रक्रिया दिनांक २४.०२.२०२६ को सफलतापूर्वक पूरी हो गई है। यह अधिग्रहण कार्यक्रम दिल्ली में एनटीपीसी मुख्यालय पर आयोजित किया गया। इस परियोजना के पुनरुद्धार एवं पुनर्संरचना के लिए प्रस्तुत किए गए संकल्प योजना को नेशनल कंपनी लॉ ट्रिब्यूनल (एनसीएलटी) से दिनांक २८.११.२०२५ को मंजूरी मिली थी। आवश्यक राशि ₹ ३,८००.१४ करोड़ का भुगतान करने के साथ ही नासिक जिले के सिन्नर में स्थित १,३५० मेगावाट क्षमता वाली कोयला आधारित ताप विद्युत परियोजना के पुनरुद्धार का मार्ग प्रशस्त हो गया है।यह अधिग्रहण महानिर्मिती (महाराष्ट्र राज्य विद्युत उत्पादन कंपनी लिमिटेड) और एनटीपीसी लिमिटेड की ५०:५० संयुक्त भागीदारी के माध्यम से किया गया है।

इस महत्वपूर्ण अधिग्रहण की सफल पूर्णता केंद्र एवं राज्य सरकारों के निरंतर मार्गदर्शन एवं समर्थन के कारण संभव हुई है। राज्य में संकटग्रस्त संपत्तियों के पुनरुद्धार, सार्वजनिक क्षेत्र की आधारभूत संरचना को मजबूत करने तथा विश्वसनीय एवं किफायती विद्युत आपूर्ति सुनिश्चित करने की राज्य सरकार की नीति के अनुरूप यह एक सकारात्मक कदम है। माननीय मुख्यमंत्री एवं ऊर्जा मंत्री श्री. देवेंद्र फडणवीस के दूरदर्शी नेतृत्व एवं सक्रिय समर्थन का इसमें महत्वपूर्ण योगदान है, जिससे राज्य में महत्वपूर्ण विद्युत आधारभूत संरचना के पुनरुद्धार को गति मिली है।

महानिर्मिती के विजन 2035 के अनुरूप, महानिर्मिती के अध्यक्ष एवं प्रबंध निदेशक श्री राधाकृष्णन बी. (आईएएस) के मार्गदर्शन एवं पूर्ण समर्थन के कारण यह अधिग्रहण तेज गति से सफलतापूर्वक पूरा होना संभव हुआ। अधिग्रहण समारोह के अवसर पर महानिर्मिती की ओर से श्री. अभय हरणे (संचालक - परियोजनाएं), श्री. मनीष वाघीरकर (संचालक - वित्त), श्री. अतुल सोनजे (मुख्य अभियंता - परियोजना एवं नियोजन तथा मुख्य कार्यकारी अधिकारी - एसटीपीएल), श्री. संदेश मोरे (मुख्य महाप्रबंधक - लेखा), श्री. राहुल दुबे (कंपनी सचिव), श्री. प्रवीण भोये (अधीक्षक अभियंता - परियोजना एवं नियोजन), श्री. अभिजीत मते (उप अभियंता - परियोजना एवं नियोजन), श्री. संदीप गेंड (कंपनी सचिव - एसटीपीएल) तथा एनटीपीसी की ओर से श्री. जयकुमार श्रीनिवासन (संचालक - वित्त), श्री. रविंदर कुमार (संचालक - संचालन तथा अध्यक्ष - एसटीपीएल), श्री. के. सुंदरम (संचालक - परियोजनाएं), श्री. अजयकुमार चतुर्वेदी (महाप्रबंधक - व्यापार विकास), श्री. मुनीश कुमार जैन (महाप्रबंधक - व्यापार विकास), श्री. उमर फारूक (वरिष्ठ प्रबंधक - व्यापार विकास) एवं अन्य गणमान्य व्यक्ति उपस्थित थे।

महानिर्मिती एवं एनटीपीसी लिमिटेड की संयुक्त भागीदारी से प्रस्तुत संकल्प योजना को दिनांक १४.०६.२०२५ को लेनदार समिति (कमिटी ऑफ क्रेडिटर्स - सीओसी) से लेटर ऑफ इंटेंट (एलओआई) प्राप्त हुआ था। यह पूरी प्रक्रिया दिवालियापन एवं शोधन अक्षमता संहिता (आईबीसी), २०१६ के प्रावधानों के अनुसार संपन्न की गई।

अधिग्रहण के बाद परियोजना के पुनरुद्धार एवं तैयारी के कार्यों की प्रारंभिक शुरुआत हो चुकी है। योजना है कि पहले दो यूनिटों को ६ से ८ महीनों के भीतर चालू किया जाए। शेष तीन यूनिटों को अगले २ से ३ वर्षों में चालू करने का लक्ष्य है। इससे महाराष्ट्र की विद्युत प्रणाली में विश्वसनीय बेस-लोड क्षमता का इजाफा होगा।

सिन्नर थर्मल पावर लिमिटेड के पुनरुद्धार से राज्य में रोजगार के अवसर सृजित होने की उम्मीद है। पुनरुद्धार, कमीशनिंग एवं संचालन चरणों में इंजीनियरों, तकनीकी कर्मचारियों, कुशल एवं अकुशल श्रमिकों, ठेकेदारों तथा सहायक सेवा प्रदाताओं को रोजगार मिलेगा। साथ ही, नासिक क्षेत्र में संबंधित एवं पूरक उद्योगों के विकास को बढ़ावा मिलेगा, जिससे क्षेत्रीय सामाजिक-आर्थिक विकास में योगदान होगा।

इस अधिग्रहण से महानिर्मिती की ताप विद्युत उत्पादन क्षमता १०,२०० मेगावाट से बढ़कर ११,५५० मेगावाट हो जाएगी। परिणामस्वरूप, ताप, गैस, सौर एवं जलविद्युत परियोजनाओं को मिलाकर महानिर्मिती की कुल स्थापित क्षमता १५+ गीगावाट तक पहुंच जाएगी, जिससे महाराष्ट्र की ऊर्जा सुरक्षा और मजबूत होगी।

यह अधिग्रहण महानिर्मिती की सतत विद्युत उत्पादन, उपलब्ध संसाधनों के कुशल उपयोग, रोजगार सृजन तथा महाराष्ट्र की दीर्घकालिक ऊर्जा आत्मनिर्भरता के प्रति प्रतिबद्धता का प्रतीक है।

******